**<u>पूरकपत्र :-</u>**

**छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान दि.२२ जुलै, २०२६ ते ०२ ऑगस्ट, २०२६ या कालावधीत कोणत्याही एका दिवशी राबविण्याकरीता मंजूरी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन पूरकपत्र क्रमांक-संकीर्ण २०२६/प्र.क्र.९४/E-१७२२५००/आस्था-८**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १३ जुलै, २०२६.

<u>संदर्भ</u>:- १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.४०/ई-८, दि.२७.०६.२०२२.
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.४०/E-१२८२६७५/ई-८, दि.०१.०७.२०२६.
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक-२०२६/प्र.क्र.९४/E-१७२२५००/आस्था-८, दि.०९.०७.२०२६

<u>प्रस्तावना</u> :-

शासनाने महसूल विभाग अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व गतिमान करण्यासाठी जाणीवपूर्वक निर्णय घेतले आहेत. या निर्णयाचा लाभ तळागाळातल्या शेवटच्या माणसापर्यंत पोहोचविण्यासाठी **मा.मुख्यमंत्री महोदय यांचा जन्मदिवस तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यामध्ये दि.२२ जुलै, २५ जुलै व २६ जुलै, २०२६ या तीन दिवसांपैकी एका दिवशी** प्रत्येक विधानसभा मतदार संघनिहाय समाधान शिबिरांचे आयोजन करण्याचा निर्णय संदर्भाधीन क्र.३ च्या शासन निर्णयान्वये घेतला होता.

तथापि, राज्यात दि.२५ जुलै, २०२६ रोजी आषाढी एकादशी असल्याने सदरहू कालावधीत राज्यातील जनता तसेच लोकप्रतिनिधी मोठ्या प्रमाणात आषाढी वारीमध्ये सहभागी होत असतात. यास्तव सदरहू शिबिर घेण्यासाठी पर्यायी कालावधी वाढविण्याची मागणी बऱ्याच लोकप्रतिनिधीनी केली आहे. सबब, शिबिराच्या एकूण पर्यायी कालावधीत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन पूरकपत्र :-</u>**

मा.मुख्यमंत्री महोदय यांचा जन्मदिवस तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य  साधून **राज्यामध्ये दि.२२ जुलै, २०२६ ते दि.०२ ऑगस्ट, २०२६ या कालावधीतील कोणत्याही एका दिवशी** प्रत्येक विधानसभा मतदारसंघात “छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान” राबविण्याकरीता शासन मंजूरी देत आहे.

संदर्भाधीन क्र.३ येथे नमूद शासन निर्णयातील उर्वरीत अटी व शर्ती कायम राहतील.

सदर शासन पूरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०७१३१४४०२७६५१९ असा आहे. सदर शासन पूरकपत्र डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

AJIT SOPANRAO DESHMUKH

Digitally signed by AJIT SOPANRAO DESHMUKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D36A0A6455652C60EA76104DD537113A9CA67AB14A315B9CEFC36FC9BE2915F8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=704CB545C50221B15CDE7CCB8854E694C765DFB3A0240E891EBFB56EE79E3440, cn=AJIT SOPANRAO DESHMUKH
Date: 2026.07.13 14:41:42 +05'30'

**(अजित देशमुख)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.) यांचे सचिव मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री (वित्त, नियोजन, राज्य उत्पान शुल्क) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
५. मा. मुख्य सचिव (महाराष्ट्र राज्य) यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई,
६. अपर मुख्य सचिव (महसूल), यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई,
८. विभागीय आयुक्त (सर्व),
९. जिल्हाधिकारी (सर्व),
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
११. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१२. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
१३. जिल्हा नियोजन अधिकारी (सर्व),
१४. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व),
१५. कार्यासन अधिकारी (ब-१), महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई
१६. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६), मंत्रालय, मुंबई
१७. नियोजन विभाग (कार्यासन १४८१) मंत्रालय, मुंबई
१८. निवड नस्ती (कार्यासन/आस्था-८)